# स्त्री—सक्षमीकरण व शेतकरी संघटना: एक विश्लेणात्मक अध्ययन

**सहा. प्रा. रणदिवे टी. वाय.**

राज्यशास्त्र विभाग, रयत शिक्षण संस्थेचे, अण्णासाहेब आवटे कॉलेज,मंचर,जि.—पुणे.

..........................................................................................

**सारांश:**

चळवळी फक्त विशीष्ट वर्गापुरता मर्यादित न राहता त्याचे स्वरुप व्यापक व्हावे. यासाठी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून ग्रामीण महिलांच्या स्त्री—सक्षमीकरण भर देण्यात आला. १९८६ मध्ये शरद जोशींच्या नेतृत्वाखाली स्त्री—सक्षमीकरण लढयाला सुरुवात झाली. प्रस्तुत निबंधामध्ये शेतकरी संघटनेच्या माध्यमातून ग्रामीण शेतकरी महिलांच्या सक्षमीकरणामधील योगदानाचा विश्लेणात्मक अध्ययन करण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रस्तावना:**

नजीकच्या परिवर्तनाच्या प्रकियेमध्ये ‘ स्त्री सक्षमीकरण ’ हा शब्द परवलीचा बनलेला आहे. विधीच्या अनुषंगाने स्त्री—पुरुष समता हा एक अंगभूत भाग आहे असे मानले तरी सामाजिक, आर्थिक व कौटुंबीक बाबींमध्ये त्यांचे स्थान नेहमी दुय्यम स्वरुपाचे राहिले आहे. भारतातील नानाविध विचारप्रवाह, राजकीय पक्ष व सामाजिक संरचनेतून हे स्पष्ट होते. मात्र शेतकरी संघटनेच्या माध्यमातून ग्रामीण शेतकरी महिलांचे सक्षमीकरणावर अधिक भर देऊन ग्रामीण महाराष्ट्रामध्ये अभिनव असा प्रयोग राबविला गेला ज्यामुळे स्त्रीमुक्ती चळवळीला गती मिळाली व स्त्रीवादी चळवळीच्या शहरी, सुशिक्षित, मध्यमवर्गीय महिलांनी चालवलेल्या आंदोलनाची मर्यादाही स्पष्ट केल्या. प्रस्तुत निबंधामध्ये शेतकरी संघटनेच्या माध्यमातून ग्रामीण शेतकरी महिलांच्या सक्षमीकरणामधील योगदानाचा विश्लेणात्मक अध्ययन करणे हे होय.

**स्त्री प्रश्नांचा स्वतंत्र अध्ययन:**

युरोपात १९६० नंतर स्त्रीवादी चळवळींचा उदय झाला होता. या चळवळीच्या माध्यमातून स्त्री प्रश्नांवर उपाय शोधले जात होते. याच पार्श्वभूमीवर भारतातसुद्धा शहरी मध्यमवर्गीय स्त्रियांचे प्रश्न हाती घेऊन स्त्रीमुक्ती चळवळ जोमाने सुरु होती. मात्र या चळवळीचे कार्यक्षेत्र स्थलक्षेत्र संकुचित स्वरुपाची होती. यामध्ये ग्रामीण महिला शेतकरी यांचा सहभाग नव्हता. अशा परिस्थितीमध्ये शेतकरी संघटनेने मनमाड येथे २६ मार्च १९८५ रोजी संघटनेच्या कार्यकारिणीची पुनर्रचना करण्यात आली. शेतकरी आंदोलनात महिलांचा वाढता सहभाग लक्षात घेउन महिलांच्या प्रश्नांच्या अभ्यासाच्या दृष्टीने प्रथमच शेतकरी महिलांचे संघटन करणारा विभाग अस्तित्वात आला. शेतकरी संघटनेने महिला आघाडीच्या माध्यमातून प्रथमच शेतकरी महिलांचे प्रश्न ऐरणीवर आणले व त्यांना संघटीत करुन त्यांच्या हक्काबाबत जागृत केले. महिलांना कुटुंबाच्या मालमत्तेत हक्क मिळवून देण्याचा महत्वाकांक्षी प्रयत्न केला. संघटनेने महिला आघाडीच्या माध्यमातून कृति कार्यक्रमावर लक्ष केंद्रित केले.

**चांदवड महिला अधिवेशन: स्त्री सक्षमीकरणात एक क्रांतिकारी पाउल:**

शेतकरी संघटनेचा चांदवड महिला अधिवेशन एक मानवतावादी व नैसर्गिक हक्कांच्या संदर्भातील व महिलांच्या जीवनात मूलगामी परिवर्तनासाठी क्रांतीकारी स्वरुपाचा होता. कारण हे अधिवेशन अनेकार्थाने महिलांचे शोषण व पिळवणूकीतून मुक्तता करुन तिला स्वतंत्र व सन्मानाचे जगण्यास प्रेरित करणारे होते. दुष्काळात स्त्रियांना खडी फोडण्यासारख्या कष्टाच्या कामावर जावे लागते हे पाहून संघटनेने शासनाने स्त्रियांसाठी रोजगार हमी अंतर्गत चरखा व प्रक्रिया उद्योग सुरु करण्याची मागणी केली. त्याचबरोबर स्त्रियांच्या कष्टात भर टाकणारा दुसरा प्रश्न म्हणजे पाणी. यासाठी शासनाच्या निधीची वाट न पाहता लोकवर्गणीतून ‘ नळपाणी योजना’ राबविण्याचा प्रकल्प हाती घेतला. स्त्रियांचे रोजचे कामाचे तास १६ असून शेतकाम व घरकाम अशी त्याची विभागणी करता येत नाही. म्हणून संघटनेने स्त्रियांना कामातून सूट व कामाच्या मोबदल्याची मागणी करण्यात आली.

या अधिवेशनातील सर्वात महत्वाचा ठराव म्हणजे स्त्रियांच्या मालमत्ता हक्काबाबत केलेला ठराव होय. या क्रांतीकारी ठरावाने प्रथमच शेतकरी महिलांच्या मालमत्ताविषयक हक्काचा प्रश्न पुढे आणला.स्त्रियांना जन्माबरोबरच पुरुषांच्या बरोबरीने मालमत्तेत वाटा मिळाला पाहिजे. त्याचबरोबर कायद्याचे राज्य निर्माण करुन महिलांची विटंबना थांबवावी अशी मागणी करण्यात आली. तर दुस—या बाजुला ग्रामीण शेतकरी स्त्रियांना राजकारणात सक्रिय करणारा ठराव केला. त्यासाठी संघटनेनी' विकेंद्रीत लोकशाही' चा आग्रह धरला. शेतकरी संघटनेच्या माध्यमातून सर्वप्रथम शेतकरी महिलांची शोचणीय, वंचित अवस्था समाजापुढे आणली. या रुपाने महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक व राजकिय जीवनात प्रथमच शेतकरी महिलांच्या सामर्थ्याचा संघटीतपणे आविष्कार झाला.

**शेतकरी संघटना आणि स्त्री हक्काचे तीन आंदोलने:**

स्त्री सक्षमीकरण ही संकल्पनात्मक ( बहुधा कृतीस्वरुपात ) चर्चा केवळ शहरी व सुशिक्षित महिलांपुरते मर्यादित राहिले होते. त्यामुळे शेतकरी महिला यापासून वंचित राहिली आहे. मात्र शेतकरी संघटनेने स्त्री प्रश्न चव्हाटयावर आणले. शेतकरी संघटनेच्या अंतर्गत महिला आघाडीने विवीध आंदोलने उभारुन आपल्या हक्कासाठी शासनविरोधी विद्रोह उभा केला.

**दारु दुकान बंदी आंदोलन:**

ग्रामीण भागात दारु दुकाने म्हणजे गुन्हेगारांचे अड्डे आहेत, हे अड्डे स्त्रियांचे जीवन उध्वस्त करणारी केंद्रे बनली आहेत. ही केंद्रे बंद झाल्याशिवाय शेतकरी महिलांचे जीवन सुरक्षीत होणार नाही या काळजीने संघटनेने दारु दुकाने बंद करण्याची विनंती केली. शासनाने त्याबाबत परिणामकारक उपाययोजना न केल्यास शेतकरी संघटना व महिला आघाडी गावागावातील दारु गुत्ते बंद करण्याचा कार्यक्रम हाती घेईल असा इशारा देण्यातआला. शासनाने संघटनेच्या या विनंतीकडे फारसे गांभीर्याने पाहिले नाही. परिणामत: महिलांनी ग्रामपंचायतीना दारु दुकान बंदीचे ठराव करण्यास भाग पाडले. ज्याठिकाणी ग्रामपंचायत दारु दुकान बंदीचा ठराव करणार नाही अशा गावात महिला कार्यकर्त्यांना एकत्र आणून दारु दुकानाला कुलुप लावणे, सील लावणे, दारु नष्ट करणे इ. उपक्रम हाती घेतले. मात्र शासनाच्या निष्क्रीय भूमिका व समाजकंटकांच्या दबावाने संघटनेचा हा कार्यक्रम प्रतिकात्मक स्वरुपाचा ठरला असला तरी पुढील काळात महाराष्ट्र शासनाने निर्णय घेतला,' ज्या ग्रामपंचायती दारु दुकान बंदीचा ठराव करतील तेथील दारु दुकाने बंद केले जातील.' या निर्णयामुळे शेतकरी महिला आघडीला यश मिळाले.

**स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक आंदोलन:**

शेतकरी संघटनेने महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणात उतरविण्याचा निर्णय घेऊन अभिनव असे आंदोलन उभे केले. या आंदोलनाने महिला आघाडीच्या भूमिकेला गती मिळाली. आणि शेतकरी संघटनेचा 'एककलमी कार्यक्रम' 'बहुकलमी' झाला. शेतकरी संघटनेने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीत सहभागी होण्यासाठी 'समग्र महिला आघाडी'ची स्थापना केली. समग्र महिला आघाडी म्हणजे जात, पात, वर्ग, धर्म, भाषा या भेदापलिकडे जाऊन केलेली समग्र महिलांची एकजूट होय. मात्र राज्यशासनाने तेव्हापासून या निवडणूका लांबणीवर टाकण्याचा सपाटा लावला. त्यामुळे शासनाचा निषेध म्हणून शेतकरी महिला आघाडीने ३ जुलै १९८९ रोजी 'जिल्हा परिषद कब्जा आंदोलना'ची घोषणा केली. शेतकरी महिलांच्या कब्जा आंदोलनामुळे केंद्र व राज्य शासनात खळबळ निर्माण झाली. परिणामत: तत्कालीन पंतप्रधान श्री राजीव गांधी यांनी महिलांचा सार्वजनिक उपक्रमातील सहभाग वाढविणे व स्त्रीयांच्या प्रश्नांचा सर्वांगीण अभ्यास करण्यासाठी एक समिती स्थापन केली. त्याचे फलीतयश म्हणून केंद्र शासनाने १९९२ मध्ये राज्यघटनेत ७३ व ७४ वा संविधान विशोधन करून महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थात ३० टक्के जागा राखीव ठेवण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्रात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूका दिनांक

२५ फेब्रुवारी १९९२ रोजी झाल्या. या निवडणूकीत शेतकरी महिला आघाडीने १६ जिल्हयातून ४०० जागा व शेतकरी संघटनेने ४०० अपक्ष उमेदवार उभे केले. शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघाडीच्या दृष्टीने निवडणूकीतील अनुभव फारसा स्पृहणीय नसला तरी शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघाडीचे १०० पेक्षा अधिक उमेदवार विजयी झाले. यामुळे शेतकरी महिला आघाडीच्या पंचायतराज निवडणूकीतील सहभाग व यशाने शासन व समाजाला स्त्रीसामर्थ्याची प्रचिती आली.

**लक्ष्मी मुक्ती कार्यक्रम:**

लक्ष्मी मुक्ती कार्यक्रम हा शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघाडीचा सर्वात क्रांतीकारी कार्यक्रम मानला जातो. चांदवड महिला अधिवेशनात स्त्रीयांच्या मालमत्ता व हक्काबाबत केवळ चर्चा व ठराव झाला होता. मात्र त्यावर कार्यवाही झाली नव्हती. लक्ष्मी मुक्ती कार्यक्रमामुळे शेतकरी महिलांच्या उत्थानाला गती मिळाली. पतीने आपल्या बरोबरीने पत्नीला जमीनीत मालकी देऊन तिचा सन्मान करणे लक्ष्मी मुक्तीचा सर्वसाधारण आशय आहे. स्त्रीयांच्या कष्टाचे कौतुक ना मुल्य ही वस्तुस्थिती पाहून शेतकरी संघटनेचे अध्वर्यु शरद जोशी यांनी शेतकरी बांधवासमोर आपल्या कुटुंबातील महिलेला संपत्तीत वाटा देणारा लक्ष्मी मुक्तीचा कार्यक्रम मांडला. लक्ष्मी मुक्ती कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या भावांना व गावांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने शेतकरी संघटनेमार्फत प्रमाणपत्र देण्यात आला. शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघाडीने केलेल्या ठरावानुसार लक्ष्मी मुक्ती कार्यक्रमात सहभागी होण्याच्या तीन पध्दती निश्चित करण्यात आल्या. ( १. मुळ हिंगोली योजना. २. सामुहिक लक्ष्मी मुक्ती. ३. व्यक्तीगत पातळीवर.) शेतकरी संघटनेने महाराष्ट्र शासनाला विनंती करून स्त्रीयांना जमीन मालकीत सहभागीदार करून घेण्याची पध्दती अधिक सुलभ व्हावी यासाठी परिपत्रक काढण्याची विनंती केली. (महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग परिपत्रक क्र. एस. १४/२१६८१६/प्र. क्र. ४५ ला ६ मंत्रालय मुंबई दिनांक १५ सप्टेंबर १९९२.) शासनाने निनंती विचारात घेवून वरील क्रमांकाचे परिपत्रक काढले. वर्षभरात लक्ष्मी मुक्ती कार्यक्रमाला यश मिळाले. सर्वाधिक यश विदर्भ आणि मराठवाडयाला मिळाले. महाराष्ट्रातील २ लाख स्त्रीयांच्या नावाने जमीनी लक्ष्मी मुक्ती कार्यक्रमामुळे झाल्या. शेकडो वर्षापासून संपत्तीच्या मालकीपासून उपेक्षीत राहिलेली स्त्री शेतकरी संघटनेच्या लक्ष्मी मुक्ती कार्यक्रमातून सहहिस्सेदार झाली.

**निष्कर्ष:**

शेतकरी महिलांच्या जीवनात स्त्री चळवळीचा नवा अध्याय नव्वदीच्या दशकात शेतकरी संघटनेने मांडला. जागतिकीकरणाच्या पर्वात वेगवेगळे क्षेत्रे प्रभावित झालेली होती. त्याचाच एक परिपाक म्हणून स्त्री प्रश्न जागतिक व्यासपीठावर चर्चिला जायचा मात्र त्याची चर्चा केवळ शहरी व सुशिक्षित स्त्रीयांपूरता मर्यादित होता. शेतकरी संघटनेने प्रथमतः शेतकरी महिलांचे प्रश्न ऐरणीवर आणून स्त्री चळवळीचा गाभा आशयसंपन्न केला. आजमितीस ग्रामीण महिलांचे प्रश्न अद्यापही पूर्णतः सुटलेले नाहीत. त्यासाठी व्यापक स्वरूपात विधायक कृती होणे अपेक्षीत आहे.

**संदर्भ:**

१. डॉ. खांदवे एकनाथ, शेतकरी संघटना ते स्वतंत्र भारत पक्ष — एक वाटचाल, बुवासाहेबनगर, कर्जत, अहमदनगर, २००७.
२. जोशी शरद, शेतकरी संघटना — विचार आणि कार्यपदधती, शेतकरी प्रकाशन, अलिबाग, १९८८.
३. पादीर श्रीकष्ण,शेतकरी संघटना नेमक्या कोणासाठी, प्रभात ११ डिसेंबर,२०१४.
४. जोशी शरद, स्त्रियांसाठी राखीव जागा, शेतकरी संघटक, २०००.
५. पाटील जयवंत, शेतकरी संघटना काय आहे, १२ नोव्हेंबर, २०११.
६. शेतकरी संघटना उदय आणि विस्तार, स्टार माझा, १३ डिसेंबर, २०१२.